# बाल ग्राम संरक्षक समिती

ग्रामपंचायत पिराचीवाडी
स्थापना १९५७
ता. जि. कोल्हापूर

सभा क्रमांक ८

दिनांक १०/१२/२०२५
वेळ सकाळी १० वाजता.
स्थळ- अंगणवाडी पिराचीवाडी

आज बुधवार दिनांक १०/१२/२०२५ रोजी सकाळी १० वाजता. पिराचीवाडी येथील अंगणवाडीत बाल ग्राम संरक्षक समितीची सभा घेणेत आली सदर सभेसाठी समितीचे खालील सदस्य सदस्या हजर होते.

| अ.नं. | नाव | हुद्दा | सही |
|---|---|---|---|
| १) | सौ. कल्पना सुभाष भोसले | सरपंच. | [signature] |
| २) | श्री बाजीराव धोंडीराम शेडे | पो.पा. सदस्य. | [signature] |
| ३) | सौ. राजश्री रविकुमार भोसले. | आशा सेविका सदस्या | RRBhosale |
| ४) | श्री कृष्णात रामचंद्र पाटील | मुख्या. पद सदस्य | [signature] |
| ५) | श्री दत्तात्रय सखाराम हांभोळे | पालक सदस्य. | [signature] |
| ६) | श्री युवराज शिवाजी सुतार | पालक सदस्य. | [signature] |
| ७) | श्री आनंदा दादू भोसले. | पालक सदस्य. | ABhosale |
| ८) | सौ. जनाबाई ज्ञानदेव डावरे | अंगणवाडी सदस्या | सौ. ज. ज्ञा. डावरे |
| ९) | चि. आरुष दत्तात्रय हांभोळे. | मुलगा सदस्य. | A.D.D |
| १०) | कु. स्वरा नाथाजी भोसले. | ~~मुलगी~~ सदस्या | [signature] |
| ११) | श्री नाथाजी श्रीपती भोसले | शाळा कमिटी सदस्य | [signature] |

वरील प्रमाणे सन्माननिय सदस्य हजर झाल्यावर सभेच्या कामास सुरवात झाली.

विषय क्रमांक - १

बाल संरक्षक, बालहक्क पालकांचा सहभाग इत्यादी विषयाबाबत ग्राम स्तरावर जाणिव जनजागृती करणे.

ठराव क्रमांक - १

आजच्या सभेत वरील विषयाबाबत सविस्तर चर्चा करणेत आली समिती सचिव- सौ. जनाबाई ज्ञानदेव डोवरे यांनी सभेसमोर खालील माहिती दिली.

१) समस्यांचा शोध घेणे.
२) जिल्हा बाल संरक्षणामध्ये नियोजन नमूना आराखड्यामध्ये बाल संरक्षण बाबीवर वार्षिक नियोजन करणे. बालकांना व त्यांच्या कुटुंबाना आर्थिक आधार देणे. तसेच त्यांना अन्न, वस्त्र, निवारा सामाजिक सुरक्षा वैद्यकिय सुरक्षा उपजिविकेचे साधन इत्यादी जिल्हा बाल संरक्षक यांच्याशी समन्वय साधणे.
३) पिडित बालकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे.
४) बालकावर परिणाम करणाऱ्या विविध समस्या.
५) बालविवाह बाल कामगार अनैतिक व्यापार बालकाचे लैंगिक शोषण इत्यादी प्रतिबंधात्मक उपाय योजना करणे.

वरील प्रमाणे कार्यवाही करणेचे ठरले

सुचक - नाथाजी गणपती भोसले.

अनुमोदक - युवराज शिवाजी कुमार.

ठराव सर्वानुमते मंजूर.

वरील प्रमाणे सर्वानुमते आभार मानून समिती अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.